महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

| माहितीचा अधिकार | | |
|---|---|---|
| | कार्यालयाचे नाव :- कार्यकारी अभियंता, अति उच्च दाब संवसु विभाग, बीड.<br>कार्यालयाचा पत्ता :- १३२ के.व्ही. उपकेंद्र परिसर, ईदगाह नाका, नाळवंडी रोड, बीड.<br>सि.आय.एन.क्र. :-U40109MH2005SGC153646<br>दुरध्वनी क्र. :- ८२७५००६५०५/८४११८४५१९१<br>ई-मेल :- ee2230@mahatransco.in<br>संकेतस्थळ :- www.mahatransco.in | |


जा.क्र. काअ/अउदा/संवसु/वि/बीड/मासं/ No 0142 दि. 12 FEB 2026

## जाहीर नोटीस

महापारेषण **अति उच्च दाब (संवसु) विभाग, बीड** अंतर्गत शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ नुसार सन २०२६-२०२७ करीता विजतंत्री (Electrician) या ट्रेंडमध्ये शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

सदर शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी शासनाच्या www.apprenticeshipindia.org http://apprenticeshipindia.gov.inapprenticeship/opprutunity या संकेतस्थळावर **अति उच्च दाब (संवसु) विभाग, बीड** च्या खालील आस्थापना रजिस्ट्रेशन क्रमांकावर **E11162703222** ऑनलाईन अर्ज सादर करणे गरजेचे आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक ११.०२.२०२६ रात्री २३:५९ पर्यंत राहील. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. विजतंत्री (Electrician) शिकाऊ उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा अधिनियमानुसार रुजु दिनांकानुसार १ वर्षाचा राहिल. ऑनलाईन अर्जासाठी आवश्यक माहिती खालील अस्थापनेच्या नावे नोंदणी क्रमाकांवर करणेत यावी.

| आस्थापनेचा रजिस्ट्रेशन क्रमांक | ट्रेड | एकुण |
|---|---|---|
| **Location : E11162703222** | **विजतंत्री (Electrician)** | एकुण जागा - ( ५४ ) |

उमेदवार/परिक्षणार्थी आरक्षण टक्केवारी खालील प्रमाणे.

| विभागाचे नाव | एकुण जागा | अनु. जाती | अनु. जमाती | विजा -अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | ईमाव | एसीबीसी | ईडब्लुएस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अउदा संवसु विभाग बीड | | १३ % | ७ % | ३ % | २.५ % | ३.५ % | २ % | २ % | १९ % | १० % | १० % | २८ % |
| | ५४ | ७ | ४ | २ | १ | २ | १ | १ | १० | ६ | ५ | १५ |

१. शैक्षणिक अर्हता :- महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे तसेच राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री या व्यवसाय परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२. विद्यावेतन शासनाच्या नियमाप्रमाणे लागु राहील.

३. पदसंख्या कमी किंवा जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व निर्णय घेण्याचा अधिकार व्यवस्थापनाकडे राखीव असतील तसेच सदरचे निर्णय उमेदवारास कळविणे व्यवस्थापनास बंधनकारक असणार / राहणार नाहीत. कार्यालयाचे ठिकाण **कार्यकारी अभियंता, अउदा (संवसु) विभाग, बीड. १३२ के.व्ही. उपकेंद्र, परिसर, ईदगाह नाका, नाळंवडी रोड, बीड पिन कोड क्र. ४३११२२**

४. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी आरक्षण शासनाच्या नियमांनुसार लागु राहील.

५. ऑनलाईन अर्ज सादर करताना एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नाव व आधारकार्डवर नमुद केलेल्या नावाशी सुसंगत आहे किंवा कसे ? याची पडताळणी करुन माहीती भरावी.

६. एस.एस.सी. गुणपत्रक / प्रमाणपत्र व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रक / प्रमाणपत्र (दोन/चार ही सेमिस्टरची) साक्षांकित प्रत व शाळा सोडल्याचा दाखला ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.

७. शिकाऊ उमेदवाराची सही, पालकाची सही, प्रवर्ग, जन्मतारीख, एस.एस.सी मार्क, आयटीआय मार्क ची माहिती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

८. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेमध्ये जे उमेदवार त्यांचा अर्ज परिपूर्णपणे वेबसाईटवर भरतील अशाच उमेदवारांचा तात्पुर्ती (Provisional) गुणवत्तेसाठी विचार केला जाणार असून, त्यामधील कागदपत्रे पडताळणीकरीता गुणवत्तेतील फक्त १०० (या विभागाच्या मंजुर पदानुसार एकास तीन याप्रमाणे संख्या देण्यात येईल) उमेदवांराना अंतिम निवडीसाठी उपरोक्त कार्यालयीन पत्यावर सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहणेबाबत, विजकीय संदेशाव्दारे सुचित करण्यात येईल. त्याचबरोबर ज्या उमेदवारांनी आस्थापणा कोडवर नाव नोंदणी केलेली आहे परंतू अंतिम निवडीसाठी बोलविलेले नाही त्यांची गुणवत्ता यादी त्यांच्या मेलवर उमेदवारांच्या माहिती करीता पाठविण्यात येईल, जेणे करुन उमेदवारांकडून अधिकची चौकशी अथवा पत्र व्यवहार करावा लागणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

९. सदर प्रक्रियेमध्ये विभागाच्या कार्यक्षेत्रातील उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. या विभागात बीड जिल्हा व धाराशिव जिल्ह्याचा सामावेश आहे.

१०. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान शिकाऊ उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-यांकडून दबाव आणल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रदद करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

११. शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करतांना पोर्टलवर फोटो, मुळ प्रमाणपत्रांची सुस्पष्ट स्कॅन करुन योग्य रितीने ऑनलाईन (Online) अर्ज सादर करावा. फोटो अथवा मुळ प्रमाणपत्र सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१२. प्रशिक्षण घेऊ ईच्छिणा-या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण कालावधीत कोणताही तंत्रनिकेतन किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयात पदविका/पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला नसावा. वरील कागदपत्रे अपलोड न केल्यास नोंदणीधारकांना पुढील प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना ई-मेलव्दारे कळविण्यात येईल. तरी कोणीही महापारेषण कार्यालयास भेट देवू नये. तसेच जाहीरातीमध्ये किंवा जाहिरातीच्या काही भागांमध्ये अंशत: बदल किंवा संपूर्ण जाहीरात रदद करण्याचे अधिकार हे कंपनी राखून ठेवत आहे. सदर बाबतीत कुठल्याही प्रकारचा अधिकचा पत्रव्यवहार व याअनुषंगाने कोणतिही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१३. वयोमर्यादा १८ ते ३० वय वर्षे (मागासवर्गीयांसाठी ०५ वर्षे शिथिलक्षम)

१४. ऑनलाईन (Online) अर्ज सादर करताना उमेदवाराने सदयस्थितीत कार्यान्वित असणारा Email-ID व भ्रमणध्वनी क्रमांक कार्यान्वित नसल्यामुळे संपर्क करणे शक्य झाले नाही तर त्याची पूर्ण जबाबदारी उमेदवारांवर राहील.

१५. दि. ११.०२.२०२६ नंतर ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१६. आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारांना ऑनलाईन अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाने मागणी केल्यास शासकीय नियमाप्रमाणे आरक्षणा संबंधित कागदपत्रे सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहतील.

१७. शिकाऊ उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे त्यांना महापारेषण कंपनीमध्ये नोकरी मिळेल याबाबत कोणताही अधिकार राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

१८. निवड झालेल्या उमेदवारांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडून वैद्यकिय दाखला देणे बंधनकारक आहे. तसेच निवड झालेल्या प्रत्येक उमेदवाराने (पोलिस पाटील, मुख्याध्यापक, नगरसेवक, सरपंच यांच्या स्वाक्षरीचे) चारित्र प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१९. कागदपत्रे तपासणी किंवा शिकाऊ उमेदवार म्हणुन हजर होण्याकरीता कोणत्याही रक्कमेची पुर्तता कंपनी देणार नाही.

२०. प्रशिक्षण कालावधीमध्ये महापारेषण कंपनीकडुन शिकाऊ उमेदवारांस कोणत्याही प्रकारची निवासव्यवस्था उपलब्ध करून देण्यात येणार नाही / मागणी करता येणार नाही.

(वासुदेव लबासे)
**कार्यकारी अभियंता**
**अ.उ.दा. (संवसु) विभाग, बीड.**